महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in


क्रमांक:-डब्ल्यूईबी-१०२०/सीआर-२६/२०२१/तेवीस दिनांक:-१७ ऑगस्ट, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

## विषय:- अर्जासोबत प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर करण्यासंदर्भात

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची नव्याने विकसित करण्यात आलेली ऑनलाईन अर्जप्रणाली https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर स्थापित करण्यात आली आहे. सदर नव्याने विकसित अर्जप्रणालीद्वारे यापुढील काळात आयोगामार्फत प्रसिध्द होणा-या विविध भरतीप्रक्रियांच्या जाहिरातींच्या अनुषंगाने अर्ज स्वीकारले जातील. तसेच सदर अर्जप्रणालीद्वारे अर्ज सादर करताना अर्जाद्वारे केलेल्या दाव्यांच्या अनुषंगाने वैध प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य करण्यात येत आहे.

२. जाहिरातीस अनुसरुन आवश्यक प्रमाणपत्रांचा तपशील भरतीप्रक्रियेच्या जाहिरातीमध्ये नमूद करण्यात येईल, तथापि, संबंधित भरतीप्रक्रियेकरीता (एकापेक्षा जास्त टप्प्याची भरतीप्रक्रिया असेल तर पूर्व परीक्षेचा) अर्ज सादर करण्याच्या वेळी वैध असणारी प्रमाणपत्रे संबंधित भरतीप्रक्रियेकरीता वैध मानण्यात येतील.

३. प्रोफाईलद्वारे केलेल्या विविध दाव्यांच्या अनुषंगाने उमेदवाराची पात्रता अजमावल्यानंतर (Check eligibility) उमेदवार जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्यास अर्ज सादर करताना सर्वसाधारणपणे खालील कागदपत्रे/प्रमाणपत्रे (लागूअसलेली) अपलोड करावी लागतील:-

| अ.क्र. | अर्जातील दावा | कुणी सादर करावे. | प्रमाणपत्र/कागदपत्र |
|---|---|---|---|
| १ | नाव | सर्व उमेदवारांना अनिवार्य | (१) एस.एस.सी. अथवा तत्सम शैक्षणिक अर्हता<br>(२) उमेदवाराने एस.एस.सी. अर्हता धारण न करता दुरस्थ पध्दतीने पदवी धारण केली असल्यास पदवीचे प्रमाणपत्र अथवा पदवीचे अंतिम वर्षाचे गुणपत्रक |
| २ | वय | सर्व उमेदवारांना अनिवार्य | (१) मॅट्रिकचे प्रमाणपत्र/माध्यमिक शालांत प्रमाणपत्र<br>(२) विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेले वयाचे प्रमाणपत्र<br>(३) शासनाच्या स्थायी सेवेतील उमेदवारांच्या बाबतीत - उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांच्या सेवा अभिलेख्यात नोंदविलेला त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या सेवा अभिलेख्यातील उता-याची प्रमाणित प्रत (अर्जात दावा केला असल्यास)<br>(४) जन्म दिनांक नमूद असलेला शाळा / महाविदयालय सोडल्याचा दाखला.<br>(५) नगर पालिका / महानगरपालिका / ग्रामपंचायतीचा जन्म दाखला.<br>(६) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे महानगरपालिकेच्या स्थायी सेवेतील उमेदवार किंवा बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या नियंत्रणाखालील पदासाठी अर्ज करणारे उपक्रमाच्या स्थायी सेवेतील उमेदवार यांना उपरोल्लेखित प्रमाणपत्र किंवा त्यांचा जन्मदिनांक नमूद करणा-या त्यांच्या सेवा अभिलेखातील प्रमाणित उता-याची प्रत (अर्जात दावा केला असल्यास) |
| ३ | शैक्षणिक अर्हता | सर्व उमेदवारांना अनिवार्य | (१) पदवीच्या अंतिम वर्षाचे गुणपत्रक तसेच/व<br>(२) पदवी प्रमाणपत्र अथवा तात्पुरते पदवी प्रमाणपत्र अथवा पदवीच्या सर्व सत्राचे गुणपत्रक |
| ४ | सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग | सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गाचा दावा करणारे सर्व उमेदवार | महाराष्ट्रातील सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेला जातीचा दाखला<br>• अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती व्यतिरिक्त अन्य मागास प्रवर्गातील उमेदवार क्रिमीलेयर मध्ये समाविष्ट होत असल्यास जातीचा दाखला सादर करण्याची आवश्यकता नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | आर्थिकदृष्टया दुर्बल घटक | आर्थिकदृष्टया दुर्बल घटकाचा दावा करणारे उमेदवार | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे वैध प्रमाणपत्र<br>• वैध प्रमाणपत्र म्हणजे जाहिरात प्रसिध्द झालेल्या आर्थिक वर्षातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र |
| ६ | नॉन-क्रिमीलेयर | विमुक्त जाती/भटक्या जमाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागास प्रवर्ग, विशेष मागास प्रवर्ग, अराखीव महिलांकरीता राखीव पदासाठी दावा करणारे सर्व उमेदवार | वैध नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>• मागासवर्गीय विवाहीत महिलांनी लग्नापूर्वीच्या नावाने व अराखीव विवाहित महिलांनी लग्नानंतरच्या नावाने प्रमाणपत्र सादर करावे.<br>• वैध प्रमाणपत्र म्हणजे जाहिरात प्रसिध्द झालेल्या आर्थिक वर्षातील नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र<br>• मूळ नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राची वैधता वाढवून घेतली असल्यास मूळ नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्र व वाढविलेल्या मुदतीचे प्रमाणपत्र एकत्रितरित्या सादर करावे. |
| ७ | पात्र दिव्यांग व्यक्ती | दिव्यांगासाठी आरक्षित पदासाठी दावा करणारे उमेदवार | एसएडीएम किंवा स्वावलंबन पोर्टलद्वारे प्राप्त ४० टक्क्यांपेक्षा जास्त कायमस्वरुपी दिव्यांगत्व असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| ८ | पात्र माजी सैनिक | माजी सैनिकांसाठी आरक्षित पदासाठी दावा करणारे उमेदवार | सैनिकी सेवेतून मुक्त केल्याबाबतचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र |
| ९ | प्राविण्यप्राप्त खेळाडू | प्राविण्यप्राप्त खेळाडूसाठी आरक्षित पदासाठी दावा करणारे उमेदवार | (१) उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्याकडून प्राप्त क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल प्रमाणपत्र<br>अथवा<br>(२) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीसाठी अर्ज सादर केला असल्यास त्याची पोचपावती |
| १० | महाराष्ट्रातील अधिवास | अराखीव महिला, अराखीव प्राविण्यप्राप्त खेळाडू, अराखीव पात्र दिव्यांग, अराखीव माजी सैनिक | (१) विहित नमुन्यातील अधिवास प्रमाणपत्र<br>(२) वय व अधिवास प्रमाणपत्र<br>(३) वय, अधिवास व राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र |
| ११ | एसएससी उत्तीर्ण झाल्यानंतर नावात बदल (असल्यास) | विवाहानंतर नावात बदल करुन घेतलेल्या महिला किंवा इतर कोणत्याही कारणाने नावात बदल झालेले सर्व उमेदवार | (१) विवाह निबंधक यांनी दिलेले दाखला<br>(२) नावात बदल झाल्यासंबंधी अधिसूचित केलेले राजपत्र<br>(३) राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नांवात बदल झाल्यासंबंधीचा दाखला |
| १२ | लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन | विवाहित उमेदवार | आयोगाच्या संकेतस्थळावरील DOWNLOADS या सदराखाली उपलब्ध असलेल्या नमुन्यात उमेदवाराने स्वहस्ताक्षरात सादर करणे अनिवार्य |

४. उपरोक्त प्रमाणपत्र/कागदपत्रे आयोगाच्या संकेतस्थळावरील ‘उमेदवारांना सर्वसाधारण सूचना’ प्रकरण क्रमांक चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे असणे अनिवार्य आहे.

५. संबंधित जाहिरातीस अनुसरुन विहित निकष/पात्रता तसेच प्रोफाईलमधील दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड करावी लागतील. प्रोफाईलमधील विविध दाव्यांच्या अनुषंगाने अपलोड करावयाची संबधित कागदपत्रे प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना प्रदर्शित होतील.

६. पात्रतेसंदर्भातील विविध दाव्यांच्या अनुषंगाने प्रमाणपत्रे/कागदपत्रे अपलोड केल्याशिवाय अर्ज सादर करता येणार नाही.

ठिकाण:-मुंबई

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान<br>
महाराष्ट्र लोकसेवा आयोग